-: प्रेसनोट दिनांक- २७/०२/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक १) अभिजीत मारूती हराळे, वय - ३३ वर्षे, मुख्याधिकारी, शिरोळ नगरपरिषद, शिरोळ, जि.कोल्हापूर वर्ग - २, रा. दत्त कारखान्यासमोर शिरोळ, जि. कोल्हापूर मुळ रा. भिलवडी, ता. पलुस, जि. सांगली २) संकेत हणमंत हंगरगेकर वय - २८ वर्षे, कनिष्ठ अभियंता नगरपरिषद शिरोळ, रा. अथर्व सृष्टी अपार्टमेन्ट, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर मुळ रा. उस्मानाबाद जि. उस्मानाबाद ३) सचिन तुकारम सावंत, लिपीक नगरपरिषद शिरोळ, रा. शिरोळ, जि.कोल्हापूर ४) अमित तानाजी संकपाळ (खाजगी इसम), रा. शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांनी शिरोळ, जि. कोल्हापूर येथील गट नं.३४२८ मध्ये दत्तधाम - विहार या नावे हौसिंग सोसायटी करणेकामी बांधकाम परवाना मिळणेसाठी शिरोळ नगरपरिषद येथे दोन ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज केले आहेत. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे शिरोळ नगरपरिषद येथील बांधकाम विभागातील क्लार्क श्री सचिन सावंत व बांधकाम विभागाचे सिटी इंजीनियर श्री संकेत हंगरगेकर यांनी त्यांची फाईल्स पुढे मुख्याधिकारी यांचेकडे पाठविणेकरीता १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार मुख्याधिकारी श्री हराळे यांना भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे बांधकाम परवानाच्या फाईल्स पास करून बांधकाम परवाना देणेकरीता ७५,०००/- रूपये लाच मागणी केली.

दिनांक २१/०२/२०२३ रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक २५/०२/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी नंबर २ व ३ यांनी तक्रारदार यांची फाईल पुढे पाठविणेकरीता आरोपी नंबर २ यांनी स्वत:करीता तसेच आरोपी नंबर ०३ यांनी आरोपी नंबर २ यांचेकरीता १,००,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली. तसेच दिनांक २७/०२/२०२३ रोजी मुख्याधिकारी श्री हराळे यांची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुख्याधिकारी हराळे यांनी तक्रारदार यांच्या फाईल्स पास करून बांधकाम परवाना देणेकरीता त्यांचेकडे ७५,०००/- रूपये लाच मागणी केली. त्यानंतर आरोपी १ व २ यांनी सदरची लाच रक्कम आरोपी नं. ०३ यांचेकडे देणेस सांगीतली. त्यानंतर आरोपी कमांक ०३ याने सदरची लाच रक्कम आरोपी कमांक ०४ याचेकडे देणेस सांगीतल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन खाजगी इसम आरोपी नंबर ०४ नामे अमित तानाजी संकपाळ यांनी १,७५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **१) अभिजीत मारूती हराळे २) संकेत हणमंत हंगरगेकर ३) सचिन तुकारम सावंत, लिपीक नगरपरिषद शिरोळ, ४) अमित तानाजी संकपाळ (खाजगी इसम)** यांचेविरूध्द शिरोळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, श्री नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री संजीव बंबरगेकर, पोलीस उपनिरीक्षक, पो.हे.कॉ. विकास माने, पो.कॉ.मयुर देसाई, पो.कॉ. रूपेश माने, पो.कॉ.उदयसिंह पाटील चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.